# टायफॉइडवर होमिओपॅथिक उपचार

विषमज्वर हा सर्व लोकांमध्ये आढळून येणारा ताप आहे. मलेरियाच्या तापाचा संबंध डासांशी येतो, न्युमोनियाचा ताप, फुफ्फुस, खोकला यांच्याशी संबंधित असतो, तर टायफॉईडच्या तापाचा संबंध आतड्यांशी असतो. टायफाईडचा ताप हा साल्मोनेला टायफी नावाच्या सूक्ष्मजीवाणूंमुळे येतो. टायफाईड झालेल्या व्यक्तीच्या मलमूत्राद्वारे हे जीवाणू अन्न व पाणी यांत अस्वच्छतेमुळे, माशांद्वारे पसरतात. हेच दुषित पाणी, भाजीपाला, अन्नधान्य खाण्यात आल्यानंतर ती व्यक्ती टायफॉईडची शिकार बनते. हा जीवाणू कोरड्या वातावरणात तसेच बर्फातसुद्धा जिवंत राहत असल्यामुळे उघड्यावरील पाणी, बर्फ, आईस्क्रीमद्वारेही पसरतो.

साल्मोनेला जीवाणू हा जगभर पसरलेला असून देखील प्रत्येकालाच टायफॉईड होत नाही याचे कारण म्हणजे आपल्या शरीरातील पित्त आणि आतड्यांची रचना हे आहे. आमाशयातील पित्तामुळे हे जीवाणू मरून जातात. तसेच आतड्याच्या आतील बाजूस जे अस्तर असते ते या जीवाणूंना प्रतिबंध करते. परंतु पित्तनाशक औषधांचा, प्रतिजैविकांचा अतिप्रमाणात वापर यामुळे या महत्त्वाच्या आतड्यांमधील स्तर नष्ट होतो आणि हा टायफॉईडच्या जीवाणूंचा शरीरात शिरकाव होतो. कुठल्याही जीवाणूने शरीरात प्रवेश केल्यानंतर त्याविरोधात प्रतिकारसंस्था कार्यरत होऊन या जीवाणूंना अटकाव करण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे ताप येणे, जुलाब, उलट्या या लक्षणांद्वारे तयार झालेले विषद्रव्य बाहेर टाकले जाते. परंतु चुकीच्या औषधांद्वारे होण्यावर जुलाबावर उलटीवर विरूद्ध औषधे देऊन हे विषद्रव्य शरीराबाहेर फेकले न केल्यामुळे बरेच आजार निर्माण होतात. यालाच औषधजन्य दडपशाही म्हणतात. याशिवाय ॲलोपॅथीक औषधांच्या सतत वापरामुळे जीवाणू स्वतःच्या जीन्समध्ये बदल करून टायफॉइडच्या औषधावर मात करतो. औषधाचा भडीमार करूनदेखील टायफॉईडचे विषाणू स्वतःचे संरक्षण करून प्रजनन करत राहतो. तर एकीकडे ताप वाढत राहिल्याने रूग्ण कमजोर होत जाऊन टायफॉईडच्या उपद्रवांना बळी पडत राहतो. यालाच असे म्हणतात. म्हणजेच यात रूग्णाची प्रतिकारशक्ती वाढण्यापेक्षा जीवाणूंची औषध पचवण्याची प्रतिकारक्षमता वाढते.



होमिओपॅथी चिकित्सा व उपचार
डॉ. अमरसिंह निकम

**लक्षणे :-** विषमज्वर उपचारांअभावी ४ स्टेजेसमध्ये आढळून येतो. जीवाणू संसर्ग झाल्यानंतर लक्षणे दिसून येणाचा कालावधी ६ ते ३० दिवसांचा असू शकतो.

**विषमज्वराचा पहिला आठवडा –** सुरूवातीला आळशीपणा, अंगदुखी, डोकेदुखी, मळमळणे, पोटात अस्वस्थपणा जाणवणे, पोट फुगल्यासारखे वाटणे इ. तक्रारी जाणवतात. संध्याकाळच्यावेळी ताप येतो. तापाची नोंद केली असता,तापाचा आलेख चढत्या क्रमाचा असतो. परंतु तापाबरोबर नाडीचे ठोके जे इतरवेळी तापात वाढतात ते मंदावलेले असतात. या विरूद्ध लक्षणांमुळेच या तापाला विषमज्वर म्हणतात. रक्त तपासणीत पांढऱ्यापेशींचे, प्रमाण कमी झालेले, चे प्रमाण वाढलेले आढळून येते. या आठवड्यात नकारात्मक येते.

**विषमज्वराचा दुसरा आठवडा –** या फेजमध्ये रूग्णाला जास्त अशक्तपणा येऊन मोठ्या प्रमाणात ताप चढतो. तापात रूग्ण बरळू लागतो. छातीवर व पोटावर लालसर धब्बे उठू लागतात. पोट दुखू लागते. प्लीहा व यकृताचे आकारमान वाढते. दिवसाला ६ ते ८ वेळा हिरवट, पिवळे, घाणेरडा वास येणारे जुलाब होऊ लागतात. सकारात्मक येते.

**विषमज्वराचा ३ रा आठवडा –** खूपच गंभीर रूग्णांमध्ये आतड्यांमध्ये रक्तस्त्राव होणे. आतड्याला छिद्र पडून क्षारद्रव्यांचे संतुलन बिघडते आणि उदरपोकळीत व रक्तात विष मिसळून आणीबाणीचा प्रसंग उद्भवतो. तसेच मस्तिश्कआवरणदाह, न्युमोनिया, हृदयआवरणदाह, अस्थिदाह होऊ शकतो. काही लोकांमध्ये जंतुसंसर्ग झालेला असला तरी लक्षणे दिसून येत नाहीत परंतु अशी व्यक्ती या रोगाची वाहक असू शकते.

**विषमज्वराचा ४ था आठवडा –** तीसऱ्या आठवड्यानंतर ताप उतरू लागतो. परंतु अशक्तपणा जाणवत राहतो. काही रूग्णांमध्ये प्रतिकारक्षमता कमकुवत झाल्यामुळे टायफॉईडच्या तापाची पुनरावृत्ती होत राहते.

**टायफॉईडचे दुष्परिणाम :-**

रक्तक्षय होणे :- जुलाब, उलट्या, पोट फुगणे, आतड्यांची सूज यांमुळे भूक मंदावते परिणामी रक्ताची टक्केवारी घटते.

**केस गळणे :-** टायफाईड तापाच्या उष्णतेमुळे व याच काळात पोषणावश्यक घटकांची कमतरता यामुळे केस गळतात.

**आतड्यांची सूज :-** टायफाईडचा जीवाणू आतड्यांमध्ये राहतो. त्याठिकाणी छोट्या छोट्या जखमा होतात, त्यामुळे रक्तस्त्राव सुरू होतो. त्यामुळे संडासमधून लालसर रक्तस्त्राव होतो, खाल्लेले पचन होत नाही.

टायफाईडचे जीवाणू शरीरात जिथे जिथे जातात तिथे तिथे सूज निर्माण करतात. त्यामुळे पॅनक्रियाजला सूज येणे, लिव्हरला सूज येणे, फुफ्फुसामध्ये सूज येऊन न्युमोनिया होऊ शकतो.

रक्तवाहिन्यांत गुठळ्या होऊन एखाद्या अवयवाचा रक्तपुरवठा खंडीत होऊ शकतो. मेंदूपर्यंत हे जीवाणू पोहचले तर मेंदूला सूज येते. त्यामुळे पेंशट असंबंद्ध बडबड करू लागतो. किंवा कोमामध्ये सुद्धा जाऊ शकतो.

**निदान :-** या आजाराचे निदान रक्ताच्या चाचण्यांद्वारे होते. तसेच रक्तातील जीवाणूंविरूद्ध वाढलेली प्रतिपिंडे याद्वारे होते. पोटाच्या सोनोग्राफीद्वारे प्लीहा व यकृताचे वाढलेले आकारमान कळून येते.

**केस**

एका ५० वर्षाच्या रूग्णाला २ ते ३ लोकांनी धरत आणून माझ्या कन्सल्टिंग रूममध्ये बसवले. ती व्यक्ती अतिशय अशक्त, झोपाळलेल्या अवस्थेत होती. तसेच त्यांचे पोट कडक झालेले, नाडीचे ठोके अतिशय मंदावलेले होते, रक्तदाब खूपच कमी झालेला होता, शरीर खूपच थंड पडलेले होते. माहिती विचारली असता त्यांना तीन आठवडयांपासून सतत अंगदुखी व अशक्तपणा जाणवत होता. डॉक्टरांनी टायफॉईडचे निदान करून औषधोपचार देऊनसुद्धा त्यांना सतत उलटया होत होत्या. त्याचबरोबर संपूर्ण शरीरावर सूज येत होती. टायफॉईडमुळे आतडयांना सूज येऊन आरपार छिद्र पडल्यामुळे पोट प्लायवूडसारखे झाले तसेच अन्नपाणीदेखील पचत नव्हते. अष्या आणीबाणीच्या प्रसंगी रूग्ण माझ्याकडे आला.

**तक्रारी :-** १. सतत ताप येणे २१ दिवसांपासून- ताप येऊन थंडी वाजणे. तापात थंड घाम सुटणे. त्वचा थंडगार पडणे. तापात अंगदुखीचा त्रास होणे. २. सतत पोटदुखी व संपूर्ण शरीराला सूज १५ दिवसांपासून ३. सतत मळमळ व उलटीचा त्रास होणे १५ दिवसांपासून ४. अशक्तपणा येऊन चक्कर येणे १५ दिवसांपासून. थोडयाष्या ही हालचालींनी अशक्तपणा जाणवणे, चालताना तोल जाणे.

**विशेष माहिती :-** १. तंबाखूचे व्यसन २. अजिबात भूक न लागणे. ३. अतिशय कमी प्रमाणात तहान लागणे. ४. शौचाला कडक, काळसर व घाण ५. शरीराला थंड घाम येणे. ६. आजारपणात जास्त प्रमाणात झोप येणे. ७. जेवणात आंबट पदार्थांची, फळांची आवड. ८. उष्ण प्रकृति.

**स्वभाव :-**

**१. तुमच्या स्वभावाबद्दल सांगा?**

मला पटकन राग येतो. मला कुणी विरोध केलेला, अपमानास्पद बोललेलं, ओरडून बोललेलं सहन होत नाही. खूपच रागात मी शिवीगाळसुद्धा करतो.

**२. तुमच्या कामाबद्दल सांगा?**

पूर्वी उत्तरप्रदेशला राहत असताना मी शेतीकाम करत असे परंतु सध्या मी पुण्यात गुरेढोरे सांभाळण्याचे काम करून माझ्या कुटुंबाचे पोट भरतो आहे.

**३. तुमच्या ताणतणावांविषयी सांगा?**

माझ्या आयुष्यात मी अनेक चढउतार पाहिले? भावंडांमध्ये मोठा असूनदेखील मला कधीच मानसन्मान मिळाला नाही. मी माझी सर्व कर्तव्ये पार पाडली. परंतु जमिनीचे वाटे केल्यानंतर माझ्याहून लहान भावाला त्यातील हिस्सा जास्त देण्यात आला. त्यावरून घरात खूप भांडणे झाली आणि मला घरातून हाकलून दिले गेले. याचाच मला जास्त त्रास होतोय.

**संपूर्ण व्यक्तिमत्व :-** १. क्षिणलेली, झोपाळलेली अवस्था २. विरोध सहन न होणे. ३. अपमानित झाल्याची भावना. ४. शिवीगाळ करण्याचा स्वभाव. ५. शरीरद्रव्यांचा अभाव. ६. तापात जास्त झोप लागणे. ७. शरीर थंडगार पडणे व अतिशय मंद नाडीचे ठोके. ८. अतिशय अशक्तपणा ९. खाण्यात आंबट आणि फळांची आवड. १०. तंबाखूचे व्यसन. ११. उष्ण प्रकृति

**प्रतिसाद :-** वरील लक्षणांवरून मी रूग्णाला ॲडमिट करून एकच होमिओपॅथीक औषध चालू केले. औषध चालू केल्यानंतर १५ मिनिटांतच नाडीचे ठोके ५०/उपद आणि रक्तदाब 40/60 CC Ud झाला. माझ्या असिस्टंट डॉक्टरानां मी तासाला रक्तदाब व नाडीचे ठोके निरीक्षण करण्यास सांगितले. रोज तासांनी नाडीचे ठोके 56/C व रक्तदाब 90/60 CC Ud झाला. दुसऱ्या दिवशीच त्यांचे उलटी होणे थांबले. अशक्तपणा हळूहळू कमी झाला. पोटदुखी, ताप येणे कमी झाले. १० ते १५ दिवसांतच रूग्ण स्वस्थ होऊन हिंडूफिरू लागला. आतड्यातील छिद्र पूर्ण भरून आले. आणि त्यांची पोटावरील शस्त्रक्रिया वाचली, टायफॉईडदेखील पूर्ण बरा झाला.

# सिंहगड रस्त्यावर ३० टन 'निर्माल्य' संकलन

▮ पुणे : प्रतिनिधी

दहा दिवस गणेशाची पूजा-अर्चा झाल्यानंतर अनंत चतुर्दशीच्या दिवशी मूर्तीचे विसर्जन करताना निर्माल्यही पालिकेतर्फे ठेवण्यात आलेल्या निर्माल्यकुंडात जमा करण्यात आले. फक्त सिंहगड रस्त्यावरील विसर्जन घाटावर ठेवण्यात आलेल्या कुंडांमध्ये तब्बल तीस टन निर्माल्य संकलन करण्यात आल्याची माहिती महापालिकेच्या टिळक रोड क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दिली. पालिकेच्या या मोहिमेलाही गणेशभक्त नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत समाजात एक चांगला संदेशही दिला.

गणेशोत्सव काळात निर्माल्य संकलन करण्यासाठी महापालिका सहायक आयुक्त रवि पवार यांच्यासह विभागीय आरोग्य निरीक्षक गणेश कांबळे, प्रकाश खंडाळे, उपअभियंता जयंत नाझरे, आरोग्य निरीक्षक सुहास पांढरे, किशोर एकल, प्रियांजली पवार, आशिष सुपनार, संदीप खेराडे, मुकादम अमर धुमाळ, मारुती खताळ, सुनील क्षीरसागर, अरुण पवार, रोहिदास फुंदे, चंद्रशेखर पवार व हेमंत पवार यांनी काम पाहिले.

पुणे-मुंबई शहरांसह राज्यभरात यंदा दुष्काळाच्या तीव्र झळा बसत आहेत. पाणीटंचाईलाही सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत गणेशोत्सव काळात जमा झालेले निर्माल्य वाहत्या पाण्यात टाकून उपलब्ध पाणीसाठा दूषित करण्याऐवजी संकलित निर्माल्य कुंडामध्ये

**पाण्यात टाकण्याऐवजी विसर्जन घाटावर केले जमा**

जमा करण्याकडे नागरिकांचा कल अधिक असल्याचे दिसून आले.

सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडी नदीपात्रात ३२०० किलो निर्माल्य संकलित झाले. त्यापैकी २ हजार किलो फक्त शेवटच्या दिवशी झाले. एस. एम. जोशी पूल नदीपात्रात १४०५ किलो, दत्तवाडी नदीपात्रात १६९ किलो, लकडीपूल-विठ्ठल मंदिर मार्ग नदीपात्रात ४६३ किलो असे मिळून नदीपात्रात एकूण ५२३७ किलो निर्माल्य संकलित झाले. विठ्ठलवाडी हौदाजवळ ५ हजार ६० किलो, एस. एम. जोशी पूल हौदाजवळ १४६२ किलो, दत्तवाडी हौदाजवळ १४८ किलो असे मिळून विसर्जन हौदाजवळ सात हजार ४७० किलो निर्माल्य जमा झाले.

जनता वसाहत कॅनॉलजवळील ७५० किलो, पर्वती पायथा कॅनॉलजवळ २ हजार ८२७ किलो, वडगाव बु. कॅनॉलजवळ ५ हजार ७८३ किलो, धायरी फाटा कॅनॉलजवळ ४ हजार ६६९ किलो, मा. जगताप ऑफिस कॅनॉललगत ९१५ किलो, तर नांदेड फाटा कॅनॉलजवळ १ हजार ९३३ किलो असे मिळून या ठिकाणी १६ हजार ८७७ किलो निर्माल्य गोळा झाले आहे. तसेच सन प्लेट बिल्डिंगसमोर सनसिटी डी. पी. रोड (टाकी) जवळ ६५५ किलो निर्माल्य संकलित झाले. या सर्व ठिकाणी मिळून तीस हजार २३९ किलो निर्माल्य संकलित झाले.

# 'डायल १०८'च्या वतीने २४८ रुग्णांना मदतीचा हात

▮ पुणे : प्रतिनिधी

गेले १० दिवस सुरू असलेल्या गणेशोत्सवादरम्यान झालेल्या आपत्कालीन आणि गर्दीमुळे जीवावर बेतणाऱ्या प्रसंगांतून २४८ नागरिकांचे प्राण वाचविण्यात आले. यामध्ये २१ रुग्णवाहिका, रुग्णांजवळ जाऊन तातडीने मदतकार्य करण्यासाठी १० 'इमर्जन्सी गो-टीम'चा समावेश होता, अशी माहिती महाराष्ट्र इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसचे मुख्य संचालन अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर शेळके यांनी दिली.




गणेशोत्सवाच्या काळात दिनांक १७ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर या विसर्जन मिरवणुकीपूर्वीपर्यंतच्या कालावधीतील आकडेवारीनुसार एकूण २४८ रुग्णांना मदतकार्य करण्यात आले. यामध्ये शहरातील विविध ठिकाणी बेशुद्ध पडणे, रोड अपघातात गंभीर दुखापत, फ्रॅक्चर, हृदयविकार, गर्दीतील प्रसूतिवेदना अशा गंभीर आजारांवर आणि इतर आजारांवर आप्तकालीन सेवा देण्यात आल्या.

गणपती विसर्जन मिरवणूक दरम्यान होणाऱ्या गर्दीच्या ठिकाणी येणाऱ्या आपत्ती विचारात घेऊन रुग्णांना तातडीने मदत देता यावी यासाठी मागील वर्षीपासून सुरू करण्यात आलेल्या 'इमर्जन्सी गो-टीम' आप्तकालीन कीटद्वारे रुग्णांवर तातडीने प्रथमोपचार करता येतात. यंदाच्या वर्षी अशाप्रकारच्या १० गो-टीम विसर्जन मिरवणुकीमध्ये तैनात करण्यात आल्या होत्या.

सिकंदरे आज़म जगातील सर्वश्रेष्ठ
भारतात सेक्स पावर कॅप्सूल उपलब्ध
नविन विश्वास, एकाच कॅप्सूलने इंद्रियात अविश्वसनीय वाढ व स्फुर्ती नसांची खराबी, शीघ्रपतन, स्वप्न दोष, नपुंसकता दूर करा. मनासारखा सेक्स टाईम मेडीकल स्टोअरमधून खरेदी करा वा फोन करा.
09212358677
09311303434

# विसर्जन मिरवणुकीत 1200 जणांची तपासणी

## निरंजन सेवाभावी संस्थेचा उपक्रम; गणेशोत्सवात २५२० रुग्णांना लाभ

▮ पुणे : प्रतिनिधी

गणेश विसर्जना दरम्यान दिवसभर मिनी हॉस्पिटलमध्ये पोलीस आणि दर्शनासाठी येणारे गणेशभक्त मिळून सुमारे १२०० व्यक्तींची तपासणी करण्यात आली. यामध्ये रक्तदाब, मधुमेह, अंगदुखी, छातीत दुखणे, खरचटणे आदी तक्रारी घेऊन येणाऱ्यांची संख्या सर्वाधिक होती. गणेशोत्सवात दहा दिवस सुरु असलेल्या हॉस्पिटलमध्ये वेगवेगळ्या आरोग्यविषयक समस्या घेऊन येणाऱ्या तब्बल २५२० जणांची तपासणी करुन मोफत वैद्यकीय सेवा देण्यात आली आहे.

निरंजन सेवाभावी संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही विश्रामबाग-फरासखाना पोलीस स्टेशनच्या आवारात मिनी हॉस्पिटल उभारण्यात आले.

ऊन-पावसाच्या खेळामुळे बदललेल्या वातावरणाने सर्दी, खोकला, जुलाब, उलट्या यांसारख्या तक्रारी घेऊन येणाऱ्यांची संख्यादेखील जास्त आहे. पोलीस व गणेशभक्तांच्या आरोग्यविषयक समस्या त्वरीत सोडवून मोफत औषधे दिली जात असल्याने गणेशोत्सवातील बंदोबस्तासाठी आम्ही सक्षम राहिलो असल्याची भावना

पोलिसांनी व्यक्त केली. नागरी संरक्षण दलातील सेवकांसह नाशिक कुंभमेळाव्यात सेवा बजावून पुण्यातील गणेशोत्सवात सेवा देणाऱ्या राज्यातील इतर पोलिसांना निर्माण झालेल्या आरोग्यविषयक समस्या मिनी हॉस्पिटलमध्ये सोडविण्यात आल्या. पोलिसांसह गणेशभक्तांना त्वरीत उपचार मिळावेत, याकरीता मिनी हॉस्पिटलमध्ये ५ बेड आणि सर्व प्रकारची औषधे, इंजेक्शन, सलाईन उपलब्ध करण्यात आले होती. तसेच आपत्कालीन परिस्थितीकरीता १० डॉक्टरांची टीम सज्ज होती. महिलांकरीता दोन बेडचा वेगळा कक्ष तयार करण्यात आला होता.

> रक्तदाब कमी झाल्यामुळे त्रास होऊ लागला. परंतु मिनी हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यानंतर त्वरीत उपचार मिळाले. त्यामुळे पुन्हा बंदोबस्ताकरीता सज्ज झालो.
> – मीरा कवटीकवार (पीएसआय, नाशिक)



गुडघेदुखी
उठतांना व चालतांना गुडघे दुखणे, गुडघ्यामागील नसां टाईट वाटणे, थोडे अंतर चालले तर पायात मुंग्या येणे व बसावे लागणे, वाकुन काम न करता येणे, नसावर नस चढणे, सकाळी शरीर जखडणे इत्यादी नसांचे आजार
अदभुत बोन थेरेपी




आजचे युग प्रचंड धावपळीचे व ताणतणावचे आहे. या धावपळीच्या जीवनात पाठीचे मणके सरकतात नि सायटिका नावाचा जीवघेणा आजार जडतो. गुडघेदुखीने माणुस जणूकाही पांगळा होतो. कंबरदुखीने, खांदादुखीने (फ्रोझन शोल्डर) माणुस बेजार होतो. मग त्याचे अनेक डॉक्टरांकडे जाणे सुरु होते, हजारों रुपये खर्च होतात. प्रसंगी ऑपरेशनचा सल्ला ऐकुन सुध्दा मोकळा होतो. तरी पण गुण येत नाही.
बंधु भगिनीनों, घाबरु नका ! ऑपेशन शिवाय आम्ही हांडांचे नसांचे सर्व आजार बरे करतो. केवळ आमच्या हाताची जादु. हाताने सरकलेले मणके नीट बसवतो, फ्रोझोन शोल्डरच्या दबलेल्या नसा मोकळया करतो व गुडध्यांचे ल्युब्रीकेशन वाढवतो. केवळ पाच मिनिटात! वरील दुखणे परत परत होऊ नये म्हणुन एक इंजेक्शन दिले जाते. या इंजेक्शनचे कोणतेही साईड इफेक्ट नाहीत. एकदा आवश्य भेट घ्या व अनुभव घ्या आणि वेदनामुक्त जगा.
तपासणी फी ३०० रु. व इंजेक्शनचा खर्च ४०००/-रु. पर्यंत येतो.
जुने रिपोर्ट, एम.आर.आय., एक्स-रे सोबत घेऊन येणे.
पेन केअर सेंटर
अत्याधुनिक अल्टरनेटीव्ह, हायटेक उपचार
बोटॉक्स थेरेपी, जाईंट ल्युब्रीकेशन थेरेपी
पुणे – जंगली महाराज रोड, हॉटेल शुभमच्या पाठीमागे, दुर्गाशंकर बिल्डींग (कृपया अपॉईटमेंट घेऊनच येणे) महिन्यातुन अल्टरनेट दोन रविवार सकाळी ८ ते ३ मो. 9420808990, 9403354523, 9822899660

विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी
३० वर्ष अनुभवी एम.बी.बी.एस. सेक्स तज्ञांचा सल्ला



हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, शिथिलता, हायपोगोनॅडिझममुळे लहान लिंग, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : विर्यामध्ये शुक्रजंतुची संख्या कमी असणे.
अॅझुस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
अशा प्रकारच्या समस्या असलेली रुग्ण विनाकारण काळजी करतात व घाबरुन जाऊन मानसिक संतुलन बिघडुन भोंदु डॉक्टरांच्या जाळयामध्ये अडकतात. आपला आजार खुपच गंभीर आहे. गुप्त आहे असा समज करुन जीवनामध्ये खुपच नैराश्य ओढुन घेतात. इथेच भोंदु डॉक्टर, तुमचा फायदा उचलून तुम्हाला अधिकच घाबरवून तुमच्याकडून हजारो, लाखो रुपये उकळत असतात. बऱ्याच वेळा या डॉक्टरांना लैंगिकविषयी ज्ञान पण नसते, पण हा प्रकार संपुर्ण थांबला पाहिजे. गुप्तरोग म्हणजे महागडा उपचार हा गैरसमज काढुन टाकला पाहिजे. या उद्देशानी आशाकिरण क्लिनीकची स्थापना केलेली आहे.
आजच फोन करुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन मिळवा.
आशाकिरण क्लिनीक
गुलाब पॅव्हेलीयन, दुसरा मजला,डेक्कन बस स्टॉपच्या मागे, डेक्कन, पुणे. वेळ - ११ ते ६ पर्यंत.
7875451644, 8657122333
पोस्टाने किंवा कोरियरव्दारा औषधीसाठी. संपर्क - 7769856821

# स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांमध्ये हृदयविषयक आजारांचा धोका अधिक प्रमाणात

**आज जागतिक हृदयदिन**

▮ पुणे : प्रतिनिधी

जागतिक पातळीवर २९ सप्टेंबर रोजी हृदयदिन साजरा केला जात आहे. वर्ल्ड हार्ट फेडरेशनद्वारा जागतिक स्तरावर साजरा केला जाणारा हा उपक्रम कार्डियोव्हॅस्क्युलर आजारांविषयी जनजागरूकता निर्माण करण्याचे कार्य करते.

इंडस हेल्थ प्लसने केलेल्या या सर्वेक्षणामधून निदर्शनास आले की, स्त्रियांच्या तुलनेत हृदयविषयक आजारांचा धोका पुरुषांमध्ये अधिक प्रमाणात वाढला आहे. पुरुष व स्त्रियांमधील हृदयविषयक आजारांचे प्रमाण ७:३ आहे. सर्वेक्षणामध्ये जवळपास २४,३८१ लोकांची जानेवारी २०१४ ते ऑगस्ट २०१५ दरम्यान प्रतिबंधात्मक आरोग्य-तपासणी करण्यात आली. त्यानंतर अहवाल प्रसिद्ध केलेला आहे. इंडस हेल्थ प्लसचे प्रतिबंधात्मक हेल्थकेअर स्पेशालिस्ट अमोल नायकवाडी म्हणाले, ४० ते ४५ वर्षे वयोगटातील पुरुष व स्त्रियांमध्ये अतिकोलेस्ट्रॉल व लिपिड प्रोफाइल हे हृदयविषयक आजारांचा धोका वाढविण्यास कारणीभूत ठरत आहे. वारंवार छातीत दुखणे, ॲसिडिटी, काम करताना श्वास घेण्यास त्रास होणे ही काही सामान्य लक्षणे आहेत,

''पुण्यामध्ये हृदयविषयक आजारांच्या समस्या वाढतच आहे, यामध्ये पुरुष व स्त्रियांचे प्रमाण सारखेच असल्याचे आढळून आले आहे. सर्वेक्षणातून निदर्शनास आले की, बीपीओ/आयटी क्षेत्रामधील २५ ते ३० टक्के श्रमजीवी लोकांमध्ये हृदयविषयक आजारांच्या धोक्याची संभावना असते. पुण्यामधील लोकांमध्ये उच्च रक्तदाब असलेल्यांमध्ये हृदयविषयक आजारांचा धोका ८ ते ९ टक्क्यांनी वाढला आहे. ''३० टक्के लोक हे विविध हृदयविषयक आजारांपासून पीडित आहेत. उशिरापर्यंत काम करणे, तणाव, ओव्हरटाइम व कमी झोप यामुळे श्रमजीवी लोकांमध्ये आकस्मिक हृदयविषयक आजार होण्याची शक्यता वाढली आहे. आजार टाळण्यासाठी प्रत्येकाने दररोज ३० ते ४० मिनिटे जलदपणे चालणे, चिंतन, योगा व संगीत थेरपी या गोष्टींचा अवलंब केला पाहिजे,' असे मत डॉ. अमित सिंकर, कन्सल्टन्ट कार्डियोलॉजिस्ट यांनी व्यक्त केले.

# पालिकेच्या २५० सफाई कामगारांचा आज गौरव

▮ पुणे : वैभवशाली विसर्जन मिरवणुकीनंतर मार्ग चकाचक करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या सुमारे २५० सफाई कर्मचाऱ्यांचा आणि स्त्री शक्ती जागर सन्मान या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन अखिल मंडई मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

आज मंगळवारी सकाळी ११.३० वाजता हा सन्मान केला जाणार आहे. यावेळी विविध क्षेत्रातील २५ महिलांचा खास सत्कार समारंभ अखिल मंडई मंडळाच्या सभामंडपात आयोजित करण्यात आला असे अध्यक्ष अण्णा थोरात यांनी कळविले आहे.

# मैत्री हृदयाशी उपक्रमाचे आयोजन

▮ पुणे : प्रतिनिधी

स्व.दानशूर कृष्णा बी. ऊर्फ अण्णा शेट्टी यांच्या ३१ व्या पुण्यस्मरणदिनानिमित्त व जागतिक हृदयदिनाच्या पार्श्वभूमीवर मैत्री हृदयाशी, कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती पद्मकृष्ण फाउंडेशनचे अध्यक्ष सदानंद शेट्टी यांनी कळविली आहे. निसर्गोपचारतज्ज्ञ लेखक श्रीकांत मुंदडा यावेळी एकपात्री कार्यक्रम सादर करणार आहेत.

आज मंगळवारी सायंकाळी पाच ते साडेसहा दरम्यान सदाआनंदनगर मंगळवार पेठ या ठिकाणी हे कार्यक्रम होणार असल्याचे कळविण्यात आले आहे.